## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : संजय शांताराम हांडे,
वय : ५२ वर्षे,
नियुक्ती निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोपरगाव, जि. अहिल्यानगर.
राहणार : अहिल्यानगर.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. घटनेच्यावेळी माझी नेमणुक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क नारायणगाव विभाग, पुणे येथे होती. घटना दि.०७/०२/२०२० रोजी घडली. त्या दिवशी मी कार्यालयात हजर असताना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, हॉटेल कृष्नीका, पारगाव शिंगवे गावच्या हद्दीत भिमाशंकर साखर कारखान्याजवळ, काठापुर रोडवर ता. आंबेगाव, जि. पुणे या ठिकाणी अवैधरीत्या दारुची विक्री होत आहे.

२. मी केंगले यांना दोन पंच घेवून येण्यास सांगितले. पंच आल्यानंतर त्यांना सदर बातमीचा आशय सांगितला. त्यानंतर आम्ही दोन पंच, सर्व आवश्यक साहित्य व लॅपटॉप घेवून खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी छापा टाकण्यास गेलो. बातमीच्या ठिकाणाच्या जवळ अलीकडे आम्ही वाहन उभे केले. पायी चालत जाऊन आम्ही हॉटेल कृष्नीकाच्या काउंटरवर गेलो. तेथे काउंटरजवळ एक इसम खुर्चीवर बसलेला दिसला. मी त्याला तेथे येण्याचा उद्देश सांगितला व स्वतःचा व आम्हा सर्वांचा परीचय करुन दिला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुरेश सहादु ढोबळे असे सांगितले.

३. आम्ही त्या हॉटेलचा शोध घेतला असता हॉटेलच्या किचनमध्ये एका कोप-यामध्ये बारदाणाखाली एक पुठ्याचा बॉक्स मिळुन आला. त्या बॉक्स पाहणी केली असता त्यामध्ये देशी जी. एम. संत्राच्या प्रत्येकी १८० एम.एल. च्या १५ बाटल्या व विदेशी मद्य ऑफीसर चॉईस कंपनीच्या १८० एम.एल. च्या २ सिलबंद बाटल्या असा एकुण रक्कम रु.१०४०/- मुद्देमाल मिळुन आला. मी त्याला दारु विक्रीचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने त्याच्याकडे दारु विक्रीचा परवाना नाही असे सांगितले.

४. त्यानंतर मी जप्त मुद्देमालापैकी देशी दारु जी. एम. संत्रा कंपनीची एक बॉटल रासायनिक पृथकरणासाठी नमुना म्हणून बाजुला काढली. त्यावरती माझ्या व पंचाच्या सहीचे लेबल लावून ती बॉटल लाखेने सिलबंद केली. सदर घटनेचा मी पंचासमक्ष पंचनामा केला. आता मला दि.०७/०२/२०२० रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचाच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात येते. रासायनिक पृथकरणाकरीता काढलेली नमुना बाटली प्रयोगशाळेत जवान केंगले यांच्यामार्फत पाठविण्यात आली. त्याबाबतचे रासायनिक तपास होवुन अहवाल मिळण्याकरीता पाठविलेले पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी व रिसिव्ह म्हणुन संबंधित व्यक्तीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२६** देण्यात येते.

५. आता मला दि.३१/०८/२०२० रोजीचा रासायनिक पृथकरणाचा अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी व प्रयोगशाळेतील संबंधित व्यक्तींची सही आहे. त्यामध्ये ४१टक्के P X V इथाईल अल्कोहोल मिळुन आले. त्यास **निशाणी क्र.२७** देण्यात येते. तपासाअंती आरोपीने मुंबई दारुबंदी कायदा नुसार गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपी सुरेश सहादु ढोबळे ला ओळखतो. आजरोजी तो न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. एम. के. वळसे यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

६. राज्य उत्पादन शुल्क नारायणगाव विभागाच्या मानाने कर्मचा-यांची संख्या कमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण कार्यक्षेत्रावर लक्ष ठेवण्याकरीता आमची धावपळ होते. नारायणगाव ते भिमाशंकर कारखाना यातील अंतर ३० कि.मी. चे आहे. आम्ही ज्या खाजगी गाडीने छापा कारवाईकरीता गेलो त्या गाडीचा नंबर एम.एच.१४ डी.एन.९३५१ असा आहे. ती गाडी माझ्या मालकीची आहे. मी खाजगी गाडी वापरण्याकरीता नोंद केलेली आहे. छापा कारवाईकरीता लागणारे साहित्य बाहेर घेऊन जाताना नोंद करावी लागत नाही. पंचाना जवान

केंगले यांनी बोलविले. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील पंच हे अनेक गुन्ह्यामध्ये पंच आहेत. हॉटेल कृष्णिकाचे गट नंबर व आकारणी यादी तपासादरम्यान आम्हाला प्राप्त झाली नाही. सदर हॉटेलचे क्षेत्रफळ किती आहे त्यासंदर्भात आम्हाला कागदपत्रे उपलब्ध झाली नाही व मला त्याचे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर हॉटेल हे भिमाशंकर कारखान्याच्या जवळ असुन गजबजलेल्या परीसरात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर अनेक दुकाने व दोन पेट्रोलपंप आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर लाईट असुन रस्ता वर्दळीचा आहे.

७. जप्त मुद्देमाल ज्या बारदानात होता, बारदानावर कोणते लेबल होते व नाव होते हे मला माहिती नाही. जप्त मुद्देमालाचा व नमुना बाटलीचा बॅच नंबर मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडून मुद्देमाल जप्त करताना फोटो किंवा व्हिडीओ काढला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासाकामी आजुबाजूच्या दुकानदारांचे जबाब नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल आजरोजी न्यायालयात नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे वय ६० ते ६२ वर्षांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा हा छापिल असल्याने तो कार्यालयातच तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या ताब्यातुन कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत नाही तो केवळ आजरोजी आरोपीच्या पिंज-यात बसल्याने मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, गुन्ह्याचा संपुर्ण तपास चुकीचा करुन आरोपीविरुध्द चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. २०/०७/२०२६**
**घोडेगाव**